## वार्षिक गुणगौरव सोहळा / नवीन युवामंच ची स्थापना :-



विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई आयोजित वार्षिक गुणगौरव सोहळ्यात नवीन युवामंच ची हंगामी कार्यकारिणी दिनांक ८ ऑगस्ट २०११ रोजी मोठ्या दिमाखात निवडण्यात आली. तत्पूर्वी युवामंच च्या कार्याची चुणूक वैविध्यपूर्ण अशा लघुचित्रफितीद्वारे, समाजबांधवाना अतिशय उत्कृष्टरित्या दाखविण्यात आली. हि लघुचित्रफित बनवून सादर केल्याबद्दल संपूर्ण युवामंच टीम ने उपस्थितांची मने जिंकून वाहवा मिळविली.

## विभागीय मेळावा :-



युवामंच तर्फे सांताक्रूझ, मुंबई येथे दिनांक १५ ऑक्टोबर २०११ रोजी विभागीय मेळावा आयोजित केला होता. सांताक्रूझ विभागातील ८५ ते ९० घरांना भेट देऊन मेळाव्यास आमंत्रित केले. या मेळाव्यास युवक-युवती, त्यांचे पालक बहुसंख्येने उपस्थित होते. तद् नंतर एक नाविन्यपूर्ण प्रयोग म्हणून Power Point Presentation द्वारे एक माहितीपट सादर करण्यात आला. त्यामध्ये युवांना युवामंचमध्ये सामील होण्यापूर्वी आणि सामील झाल्यानंतर व्यक्तिगत होणारा बदल दाखवण्यात आला. अशाप्रकारे या मेळाव्यामध्ये युवांना बहुसंख्येने 'युवामंच' मध्ये सामील होण्याचे आवाहन करण्यात आले. यातूनच अनेक युवक-युवती स्वयंस्फुर्तीने युवामंच मध्ये सहभागी झाले. अशाप्रकारे हा मेळावा यशस्वीरीत्या पार पडला.

## युवामंच वार्षिक सहल :-

तरुण मुला-मुलींचे विचार व सामाजिक बांधिलकीसाठी 'युवामंच' च्या कार्यकर्त्यांनी पूर्वाश्रमीच्या युवा कार्यकर्त्यांच्या कुटुंबा समवेत एखाद्या रम्य अशा नैसर्गिक स्थळी सहल आयोजित केली. त्यातून अनेक युवक-युवती युवामंच च्या प्रवाहात सामील झाले. हि सहल फक्त मनोरंजनापूरती मर्यादित न राहता नवनवीन युवांचे विचार व त्यांच्या कार्यक्षेत्राबद्दलची माहिती तसेच समाजा बद्दलचे विचार जाणून घेण्यासाठी आयोजित केली होती. या विचार देवाणघेवाणी मध्ये प्रत्येक युवक-युवतींनी आपले विचार मांडले. उदा. शैक्षणिक, व्यावसायिक आणि आपले कार्यक्षेत्र निवडण्याबाबत चर्चा झाली आणि त्यातूनच नवीन संकल्पनांना दुजोरा मिळाला. सरतेशेवटी दिवसभर मौज-मस्ती आणि खेळाचा आनंद लुटण्यात गेला. परतीच्या प्रवासामध्ये अशाच सहलींचे आयोजन करावे व नवनवीन युवक-युवतींना युवामंचमध्ये आकर्षित करण्यासाठी व त्यांना सामील करण्यासाठी नवनवीन उपक्रम राबवावेत **उदा. YUVA MAHOTSAV, FUN & FAIR ACTIVITY, GAMES & ENTERTAINMENT PROGRAMME** असा मनोदय सर्वांनी व्यक्त केला.



# युवामंच आढावा

## युवामंच चे सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०१२ :-




दिनदर्शिका म्हटले कि कालनिर्णय, महालक्ष्मी, तसेच राजकीय आणि व्यावसायिक दिनदर्शिका पहावयास मिळतात पण आपल्याच समाजाची दिनदर्शिका आपल्या घराच्या भिंतीवर असणे हि एक अभिमानास्पद बाब आहे. युवामंच आणि वरिष्ठांच्या आशीर्वादाने अतिशय मेहनतीने व खूपच कमी कालावधीमध्ये सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०१२ ची संकल्पना उदयास आली. संकल्पना मांडताच युवामंचचे सर्व कार्यकर्ते अत्यंत तळमळीने कामाला लागले. दिनांक २ जून २०१२ रोजी मोठ्या दिमाखात आपल्या समाजातील वरिष्ठांच्या हस्ते दिनदर्शिकेचे अनावरण करण्यात आले. जाहिराती मिळविण्यापासून ते वितरण करण्यापर्यंत प्रत्येक कार्यकर्त्याने जीवाचे रान केले आणि आज हे युवामंच चे **''सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०१२''** महाराष्ट्रातील प्रत्येक समाज बांधवांच्या घराघरात पोहोचले आहे.

## हॉलमार्किंग शिबीर (BIS Hallmarking आणि IIGJ) :-

ज्या समाजात आपण जन्माला आलो त्या समाजातील जातिवंत कलेला जपणाऱ्या कलाकारांना आधुनिकतेची जोड मिळावी. यासाठी युवामंच च्या माध्यमातून BIS हॉलमार्किंगचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीर दिनांक २२ व २३ फेब्रुवारी २०१२ रोजी




IIGJ यांच्या वातानुकुलीत कार्यशाळेमध्ये आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यातील व मुंबईतून एकूण २२ समाजबांधव या शिबिरामध्ये सहभागी झाले. या शिबिराचा खर्च प्रत्येकी रु.६०००/- आहे पण युवामंच च्या कार्यकर्त्यांनी हा कार्यक्रम समाज बांधवांसाठी मोफत मिळविण्यात यश मिळविले. या प्रशिक्षणा मध्ये हॉलमार्क म्हणजे काय? त्यांची मानांकने कशी असतात? तसेच जुन्या धाटणीच्या दागिन्यांना आधुनिक पद्धतीने कसे घडवावे याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यानंतर समाजाच्या वतीने व युवामंच च्या सहकार्याने एका छोटेखानी समारंभा मध्ये BIS Hallmarking आणि IIGJ तसेच आपल्या समाजाचे प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. अशाप्रकारे आलेल्या सर्व प्रशिक्षणार्थींनी आपल्या समाजाचे व युवामंच चे आभार मानले. अशाप्रकारे युवामंचची सोनेरी वाटचाल अशीच कायम राहिल.

## युवामंच सात उद्दीष्टे

- वित्त नियोजन
- शैक्षणिक मार्गदर्शन
- सुवर्णकारांसाठी आधुनिक प्रशिक्षण शिबीर
- रोजगार/नोकरी/व्यवसाय विषयक मार्गदर्शन
- धर्मादाय संस्थांची माहिती (Charitable Trust)
- करिअर गाईडंस आणि व्यक्तिमत्व विकास
- स्त्री व्यक्तिमत्व विकास

विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई
स्थापना १९६६ • रजि. अ-२८००

संचालित

YUVA मंच

# युवामंच वाटचाल

उडत्या पाखरांना परतीची सीमा नसावी
नजरेत सदा नवी दिशा असावी
घरट्याचे काय आहे ,बांधता येईल केव्हाही
पण क्षितिजाकडे झेप घेण्याची जिद्द असावी

# समाजाची ५ अंग

## १) संस्था (स्थापना व माहिती):-

समाजाचे हित आणि सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने सन् १९६६ साली, विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई(रजि.) या संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी तन, मन, धन अर्पण करून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण पाऊले उचललेली आहेत. खेड्यापाड्यापासून ते शहरापर्यंत समाजजागृती करून सभा, दौरे, मेळावे, परिषदा भरवून समाजात ऐक्य प्रबळ करण्याचे प्रयत्न करीत आहेत. संस्थेचे निस्वार्थी प्रभावी कार्य, निष्ठा, आपुलकी, पंचाल सुवर्णकार ज्ञाती समाजाची अस्मिता पाहून ज्ञातीजनही प्रेरित झाले आणि सामाज कार्याकडे आकर्षित होऊन एक आदर्श संस्था म्हणून आज अभिमानाने पाहिले जात आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. संस्थेने अनेक साहसी कार्यक्रम हाती घेऊन जे यश मिळविले ते तुमच्या सर्वांच्या सहकार्या मुळेच, हे यश म्हणजेच...!!! तुमचे आमचे सर्वांचेच आहे.

## २) पतपेढी:-

आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून प्रथमतः विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी(मर्या) या नावाने पतपेढी ची स्थापना दिनांक २ जून १९९२ रोजी करण्यात आली. पतपेढीची स्थापना झाल्यापासून पतपेढीची भरभराट होण्यास सुरुवात झाली. आज आपली सभासद संख्या हजारोंवर गेली असून दामदुप्पट ठेव, मुदत ठेव, विश्वकर्मा सुवर्णकार दैनंदिन ठेव योजना अशा विविध योजनांना समाज बांधवांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हे सारे यश मिळाले आहे ते संचालक मंडळाचे नेत्रदीपक कार्य अविश्रांत मेहनत व आपल्या सारख्या सुज्ञ व दानशूर समाजबांधवां मुळेच.

## ३) महिला मंडळ:-

आपल्याच समाजातील महिलांना एकत्रित आणण्यासाठी व संघटीत करण्यासाठी समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते कै. श्री. मोतिराम ल. सागवेकर यांच्या पुढाकाराने विश्वकर्मा सुवर्णकार समाज ''महिला मंडळ'' स्थापन करण्यात आले. या महिला मंडळाच्या अनुषंगाने महिलांनी हळदी कुंकू समारंभ, मंगळागौर तसेच बरेच सांस्कृतिक कार्यक्रम राबविले आहेत. या मागचा उद्देश एवढाच कि महिलांनी प्रपंचात अडकून न राहता एकविसाव्या शतकात, समाजात एक मानाचे स्थान आणि स्त्रीशक्तीची एक वेगळी छाप निर्माण करावी.

## ४) युवामंच:-

आपल्या समाजातील ज्ञातीबांधवांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करून त्यांचा शैक्षणिक व आर्थिक स्तर वाढविण्याच्या दृष्टीने व आपल्या समाजातील युवा वर्गाला एकत्र आणण्यासाठी समाजातील वरिष्ठांनी ''**युवामंच**'' ची स्थापना केली. या मागील मुळ उद्देश होता तो नवीन युवा वर्गाला समाजातील रूढी परंपरा यांची माहिती व्हावी व आपल्या अंगी असलेल्या कला गुणांचा वापर करून समाज बळकटी साठी एकत्र येऊन समाजाची उन्नती करावी.

## ५) विश्वकर्मा पंचाल वृत्तपत्र:-

पंचाल सुवर्णकार समाजाचे भारत सरकार मान्यता प्राप्त एकमेव बुलंद मासिक दिनांक १९ फेब्रुवारी १९९५ रोजी स्थापन झाले. समाजाला एक स्वयंशक्तीरूपी प्रसार माध्यमाचे व्यासपीठ लाभले आहे व या माध्यमातून समाजाला भेडसावणाऱ्या जटील समस्या मांडल्या जात आहेत. पंचाल सुवर्णकार मासिकाने अल्पावधीत मान्यवर ज्येष्ठ साहित्यिक, लेखक, समाज हितचिंतक यांच्या बरोबर गरुड झेप घेऊन महाराष्ट्रात समाजाचे नाव उज्वल केले आहे. १९९५ च्या मुंबई वृत्तपत्र लेखक संघाच्या स्पर्धेत पंचाल सुवर्णकार वृत्तपत्र पुरस्कृत दिवाळी अंकास ''**विशेष दर्पण पुरस्कार**'' देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले आहे.

# युवामंच मनोगत

नमस्कार,

सर्व प्रथम समाजातील तमाम समाज बांधवांना व हितचिंतकांना विश्वकर्मा सुवर्णकार समाज संचालित, ''**युवामंच**'' कार्यकारिणी तर्फे हार्दिक शुभेच्छा !
आपल्या समाजातील ज्ञातीबांधवांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करून त्यांचा शैक्षणिक व आर्थिक स्तर वाढविण्याच्या दृष्टीने व आपल्या समाजातील युवा वर्गाला एकत्र आणण्यासाठी आपल्या समाजातील वरिष्ठांनी ''युवामंच'' ची स्थापना केली. या मागील मुळ उद्देश होता. तो नवीन युवा वर्गाला समाजातील रूढी परंपरा यांची माहिती व्हावी व आपल्या अंगी असलेल्या कला गुणांचा वापर करून समाज बळकटीसाठी एकत्र येऊन समाजाची उन्नती करावी. पण आम्हाला एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली कि, आज समाजातील युवक हा समाजापासून दूर जात आहे, का ? कुणास ठाऊक..! असे का होत आहे..! या मागे अनेक कारणे असावीत, पण मित्रांनो जर आपणच समाजातील समाजकार्याला हातभार नाही लावला तर आपला हा समाज पुढे कशी वाटचाल करणार..! आज जो ''**वटवृक्षरुपी**'' समाज आपल्या ज्येष्ठ समाज कार्यकर्त्यांनी लावला आहे. तो वाढविण्यासाठी युवाशक्तीची गरज आहे. कारण युवा म्हणजेच आजचा युवक आणि ''**शक्ती**'' म्हणजेच ''**उर्जा**'' जर हीच उर्जा कोठे तरी कमी पडली तर समाजाचा व युवा वर्गाचा विकास कसा साध्य होईल..!

तर मित्रांनो, आज आपल्या समाजाने ''**युवामंच**'' रुपी जी मशाल हाती घेतली आहे, ती मशाल कायम स्वरूपी पेटती ठेवण्यासाठी युवकांची व त्यांच्या अंगी असलेल्या उर्जेची नितांत गरज आहे. जर संपूर्ण युवाशक्तीची उर्जा एकत्र आली तर काय चमत्कार घडू शकतो हे आपण स्वतः अनुभवू शकता, म्हणजेच आपल्या अंगी असलेल्या कला गुणांचा, नवनवीन संकल्पनेचा, सुज्ञ बुद्धीचा, आधुनिक तंत्रज्ञानाचा आपल्याच समाजबांधवांना कसा उपयोग होऊ शकतो. तसेच सर्व थरातील युवा वर्ग एकत्र आला तर त्याचा फायदा आपल्याच समाजबांधवांना आणि युवा वर्गाला सुद्धा होऊ शकतो.

उदाहरणार्थ, जर एखाद्या युवकाला तांत्रिक ज्ञान अवगत असेल तर ते ज्ञान तो आपल्याच समाजबांधवांना देऊ शकतो. तसेच नवीन काम किंवा नोकरी संदर्भात संधी चालून आली असल्यास तो आपल्याच समाज बांधवाला कळवू शकतो. अशा प्रकारे अनेक इतर फायदे होऊ शकतात हे लक्षात असू द्या.

आज युवामंच कार्यकारिणीने विविध नवीन उपक्रम हाती घेतले आहे, यामध्ये ''**युवामंच सात उद्दीष्टे**'' या उपक्रमामार्फत आम्ही आपल्याच समाजातील सर्व समाजबांधवांना तसेच तरुण युवक वर्गाला काहीतरी नवीन देण्याचा प्रयत्न करीत आहोत उदा. शैक्षणिक, तांत्रिक, नोकरी विषयक, व्यक्तिमत्व विकास, आर्थिक विकास आणि इतर उपयुक्त व्यावसायिक माहितींवर लक्ष केंद्रित केलेले आहे. या उपक्रमात आम्हाला खरी गरज आहे ती ''**युवाशक्तीची**''. युवामंच ची संपूर्ण कार्यकारिणी आपणांस असे आव्हान करीत आहोत कि, युवक-युवतींनी बहुसंख्येने ''**युवामंच**'' मध्ये सामील व्हावे आणि युवामंच बळकट करून आम्ही राबविलेल्या उपक्रमास भरघोस प्रतिसाद द्यावा.

''**बदल घडवायचा असेल, तर संघटीत व्हायलाच हवे**'' हीच सध्या येणाऱ्या काळाची गरज आहे. जसे श्री. अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार निर्मुलनासाठी जो विडा उचलला आहे, त्या मागे जी खरी शक्ती आहे, ती युवाशक्ती आणि त्याच युवाशक्तीची गरज आज आपल्या समाजाला आहे. संपूर्ण समाज बांधव एकत्र आल्यास एक नवीन क्रांती घडवू शकतो....! म्हणताना,

**''एकीचे बळ मिळते फळ''**

# युवामंच वाटचाल

# युवामंच इतिहास

भविष्यातील कार्यभार सांभाळण्यासाठी व सामाजिक अडीअडचणी समजावून घेण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा यासाठी समाजातील तरुण-तरुणींना एकत्र करून आणि मार्गदर्शन करून त्यांची एकजूट करण्यासाठी '**युवामंच**' चे प्रणेते श्री यशवंत शंकरशेठ सागवेकर साहेब (निवृत्त पोलीस अधीक्षक) व श्री सुनील दत्ताराम देवरुखकर यांनी समाजाची उत्तरोत्तर वाटचाल चालू राहावी असा मनोदय व्यक्त केला तसेच समाजाच्या प्रगतीसाठी आणि बळकटीसाठी युवाशक्तीची नितांत गरज आहे, यासाठी त्यांनी समाजाचे अध्यक्ष कै. श्री भार्गवशेठ शंकरशेठ सागवेकर, कै. श्री मोतिराम ल. सागवेकर व श्री जगन्नाथ म. देवरुखकर, सरचिटणीस श्री सदानंद दत्तात्रय नगरकर यांनी एकमताने युवमंचची स्थापना १९९६ साली करण्यात आली. त्यासाठी प्रथमतः युवामंच अध्यक्ष पदी श्री उदय रामचंद्र सागवेकर व सरचिटणीस पदी श्री रवींद्र पांडुरंग वारणकर यांची नियुक्ती केली. या टीम मध्ये श्री योगेश हरिश्चंद्र सागवेकर, श्री नितीन राजाराम देवरुखकर, सौ रेश्मा सागवेकर, श्री किरण देवरुखकर, श्री सुधीर चिखलकर आणि श्री. समीर नगरकर यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

ज्या समाजात आपण जन्मलो त्या समाजाचे ऋण फेडणे व समाजाचे हित साधणे हे आपले कर्तव्य समजून, तसेच समाजाचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय आहे हा उद्देश बाळगून आपल्या कार्याला सुरुवात केली. या युवामंच संघटनेने समाजाची आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक प्रगती व्हावी यासाठी महत्वपूर्ण पाऊले उचलली आणि त्या प्रमाणे शिरगणती, वित्तनियोजन, शैक्षणिक, वेबसाईट बनवून कार्यक्रम यशस्वी रित्या करून दाखविले. त्यानंतर नवीन तरुण तरुणींना एकसंधी देण्यासाठी व त्यांच्या कार्यकुशलतेला वाव देण्यासाठी पुर्वाश्रमीच्या कार्यकर्त्यांनी युवामंच चा कार्यभार नवीन युवा कार्यकर्त्यांच्या हाती सोपविला. त्यासाठी युवामंच समिती प्रमुख श्री समर्थ सत्यवान पालकर तसेच अध्यक्ष पदी श्री गणेश गंगाराम नगरकर, सरचिटणीस पदी श्री प्रशांत शशिकांत देवळेकर आणि कार्याध्यक्ष पदी श्री उदय नगरकर या कार्यकारिणीची सन २००३ साली नियुक्ती करण्यात आली. यांनीही समाजाला प्रगतीकडे नेण्याचे ध्येय अविरत चालू ठेवून उत्तम प्रकारे कामगिरी केली. महाराष्ट्रभर गाव ते शहरापर्यंत समाज जागृती करण्याकरता ठिकठिकाणी दौरे केले. या कार्यकारिणीने नवनवीन म्हणजेच रक्तदान व आरोग्यशिबीर, शैक्षणिक मार्गदर्शन तसेच वित्त नियोजन सारखे उपक्रम राबवून व तरुण वर्गाला एकत्रित करण्यासाठी मोलाचे योगदान दिले............

अशा प्रकारे युवामंचची सोनेरी वाटचाल पुढे कायम चालू राहण्यासाठी युवामंच चे पूर्वाश्रमीचे कार्यकर्ते श्री उदय रामचंद्र सागवेकर, श्री रवींद्र पांडुरंग वारणकर आणि श्री योगेश हरिश्चंद्र सागवेकर यांची नवीन युवामंच ची कार्यकारिणी निवडण्यासाठी समिती प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर दिनांक ८ ऑगस्ट २०११ रोजी हंगामी कार्यकारिणी निवडण्यात आली. त्या सहा महिन्यांच्या यशस्वी कार्यकाळानंतर पुढील तीन वर्षांसाठी कायमस्वरूपी कार्यकारिणी नेमण्यात आली. त्यासाठी अध्यक्ष पदी श्री निलेश बाळकृष्ण सागवेकर, सरचिटणीस पदी श्री गणेश दत्तात्रय सागवेकर यांची नियुक्ती करण्यात आली.

# वेबसाईट नूतनीकरण

आपण पाहतच असाल की काळाबरोबर कितीतरी गोष्टी बदलत आहेत. संस्थेच्या स्थापनेपासून विविध माध्यमांद्वारे जनसंपर्क होत होता, हाच जनसंपर्क अधिक प्रभावी व आधूनिक होण्यासाठी पुर्वाश्रमीचे युवामंच कार्यकर्ते श्री योगेश हरिशचंद्र सागवेकर, श्री रविंद्र पांडुरंग वारणकर तसेच युवामंच अध्यक्ष श्री उदय रामचंद्र सागवेकर यांनी समाजाची वेबसाईट असावी असा निर्णय घेतला आणि त्यांनी लावलेले वेबसाईट रूपी रोप आज वृक्ष बनून **www.vssmumbai.com** या नावाने आजही बहरत आहे.

आज युवामंच विविध योजना राबवत आहे, याच अनुषंगाने वेबसाईटचे नुतनीकरण करण्यात आले आहे. हे नुतनीकरण पुढील प्रमाणे असेल....

१) चालू वेबसाईट मधील मजकूर तसाच ठेऊन त्याच्या देखणीत बदल करून नवीन रंगरूप देण्यात आले आहे.

२) समाजातील बांधव हे कोणत्याही ठिकाणाहून आपले नाव संस्थेचे सभासद, महीला मंडळ, युवामंच सभासद या विभागांमध्ये नोंदवू शकतात व यापैकी सभासद व्यक्ती त्यास पाहू शकतो.

३) **रूढी व परंपरा-** या माध्यमाद्वारे आपल्या समाजातील रूढी व परंपरा याची ओळख करून दिली आहे.

४) **यंदा कर्तव्य आहे -** या माध्यमाद्वारे तुम्ही घर बसल्या लग्न जुळवू शकता अगदी कोणत्याही ठिकाणाहून.....

५) **Money transfer-** या माध्यमाद्वारे सभासद वर्गणी, देणगी आणि इतर धन स्वरूप संस्थेच्या अकाऊंट मध्ये घरबसल्या पाठवू शकता.

६) **New programs, Achievements, Professional Contacts** या माध्यमांचा समावेश करण्यात आला आहे.

आपल्या आर्शिवादाने वेबसाईट नूतनीकरणचे काम पूर्ण झाले आहे व लवकरच ती आपल्यासमोर येईल. वेबसाईटचा तुम्ही अवश्य लाभ घ्यावा ही विनंती.

# युवामंच कार्यकारीणी

**अध्यक्षः श्री. निलेश बाळकृष्ण सागवेकर**
**उपाध्यक्षः श्री. प्रशांत अरविंद पालकर, श्री. सुरेश पांडुरंग सागवेकर**
**सरचिटणीसः श्री. गणेश दत्तात्रय सागवेकर**
**सहचिटणीसः कु. संकेत सदानंद नगरकर, कु. रुपाली देऊ सागवेकर**
**कार्याध्यक्षः कु. विनोद सुधाकर पालकर, कु. वर्षा रघुनाथ नगरकर**
**खजिनदारः कु. भाग्यश्री चंद्रकांत सागवेकर**
**उपखजिनदारः कु. अमोल राजाराम सागवेकर**
**जनसंपर्क प्रमुखः कु. विनोद लक्ष्मण वारणकर**
**कु. सरिता संतोष देवरुखकर**
**श्री. सुधीर गंगाराम सागवेकर**
**सांस्कृतिक विभाग प्रमुखः कु. निखील रघुनाथ नगरकर**
**श्री. सचिन यशवंत देवरुखकर**

## -: विभाग प्रमुख :-

१) कु. दिनेश प्र. सागवेकर (दहिसर ते विरार) ९९७५७३६८३८
२) कु. गणेश कृ. देवरुखकर (मालाड ते बोरीवली) ९८९२५३१९०३
३) श्री. विलास स.सागवेकर (अंधेरी ते विलेपार्ले) ९८९२७०६७०३
४) श्री. प्रसाद ग. चिखलकर (सांताक्रूझ ते बांद्रा) ८१०८४०५७५९
५) कु. अजय ना. पालकर (सांताक्रूझ ते बांद्रा) ८१०८०८१५२१
६) श्री. अतुल रा. देवरुखकर (दादर ते परेल) ९८३३६५५०८९
७) कु. रुपेश च. सागवेकर (दादर ते परेल) ७७३८९०६१७७
६) कु. केतन शं. पालकर (कुर्ला ते ठाणे) ८९७६७९८७९६

# आवाहन

*तमाम ज्ञातीबांधवांना, महिलांना व युवांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी संस्थेच्या खालील विभागांमध्ये सभासद होऊन समाज उन्नतीसाठी आपले मोलाचे सहकार्य करावे.*

१) विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई - संस्था
२) विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी(मर्या)
३) विश्वकर्मा सुवर्णकार समाज ''महिला मंडळ''
४) विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई, संचालित ''युवामंच''
५) विश्वकर्मा पंचाल ''वृत्तपत्र''

## अधिक माहिती व संपर्कासाठी

**जनसंपर्क प्रमुख** - श्री. जगन्नाथ म. देवरुखकर (९०२९६८५२६३),
**सेक्रेटरी** - श्री. सदानंद द. नगरकर (९८२०८३२८००)
**पतपेढी** - श्री. योगेश ह. सागवेकर (८०९७९०९००७)
**महिला मंडळ** - सौ. वैशाली वि. करंजवकर (९८९२५१३९६१),
**पंचाल वृत्तपत्र** - श्री.जयवंत रा. देवरुखकर (९३२४१२६२४१),
**युवामंच** - कु. विनोद ल. वारणकर (९८९२१८१६२६)
कु. सरिता संतोष देवरुखकर (९९६०४७१४५८)
श्री. सुधीर गंगाराम सागवेकर (९७६९८८६४९८)

कार्यालय- ३५६/ डब्ल्यु ८, चोकशी बिल्डिंग, विठठ्लवाडी, रानडे रोड, दादर, मुंबई - २८
www.vssmumbai.com | vss.yuva@gmail.com